N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** मिरा-भाईदर, वसई-विरार **P.S.(ठाणे):** भाईंदर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0330 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/08/2023 01:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 28/08/2023

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/08/2023

**Time From (वेळेपासून):** 14:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 30/08/2023 **Time (वेळ):** 00:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 30/08/2023 00:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उप निबंधक सहकारी संस्था,ठाणे ,भाईंदर पं

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राधा मनोज गुप्ता

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1977

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ए 203, 60 फीट रोड,काशी विश्वनाथ कोआहौसोलि,भायंदर प,भाईदर, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ए 203, 60 फीट रोड,काशी विश्वनाथ कोआहौसोलि,भायंदर प,भाईदर, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8104166591

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अलीहैदर दगडु मिया शेख | | | 1. 502,काजूपाडा, बोरीवली नशनल पार्कच,ईलाईट टावर, बोरीवली पुर्व,भाईदर,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 45,000/रू. घेण्याचे मान्य करून, त्यातील पहिला हप्ता म्हणून 25,000/ रू. | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी, राधा मनोज गुप्ता, वय 46 वर्ष व्यवसाय - स्लाईडिंग विंडो हार्डवेअर मेकींग, पत्ता - ए 203, काशी विश्वनाथ को.आॅ.हौ.सो.लि., 60 फीट रोड, भायंदर (प.) अशी असून,

मी, मागील 35 वर्षापासून सदरच्या बिल्डींगमध्ये आपले कुटुंबासमवेत राहत आहे. माझा स्वतःचा स्लायडींग विंडो हार्डवेअर तयार करण्याचा व्यवसाय पारिख इंडस्ट्रीज, बी 19, विनोकेम इंडस्ट्रीयल इस्टेट, घोडदेव रोड, भाईंदर फाटकाच्या जवळ, भाईंदर (पुर्व) येथे व्यवसाय आहे. मी राहत असलेल्या काषी विष्वनाथ को.आॅ.हौ.सो. लि. 60 फीट रोड, भायंदर (प.) हया बिल्डींगच्या कमिटीने खुप भ्रश्टाचार केला आहे. त्याकरीता मी सदर भ्रश्टाचाराच्या विरूध्द तक्रार करण्याकरीता दिनांक 21/08/2023 रोजी उपनिबंधक कार्यालय, ठाणे तालुका, भाईंदर येथे गेली होती. त्यावेळी तेथे मला एक इसम भेटला. त्या इसमाने स्वतःचे नाव मॅन्युअल गोन्सालविस असे नाव सांगुन ते मानवाधिकार कार्यकर्ता असल्याचे सांगितले व ते सदर कार्यालयामध्ये लोकांची मदत करण्याकरीता असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री. मॅन्युअल गोन्सालविस यांनी मला अर्ज करण्याचे प्रारूप सांगितले होते. तेव्हा मी, मॅन्युअलने सांगितलेल्या प्रारूप प्रमाणे पत्र लिहून उप निबंधक कार्यालय, ठाणे तालुका, भाईंदर येथे दिले होते. त्यावेळी मी, मॅन्युअलचा मोबाईल क्रमांक 9820454991 घेतला होता. त्यानंतर मी, मॅन्युअलला संध्याकाळचे सुमारास काॅल केला होता आणि त्यास अॅप्लीकेषन दिल्यानंतर पुढील प्रोसिजर काय असे याबाबत विचारले त्यावर मॅन्युअल याने 'तेथे पैसे दिल्याशिवाय काम होत नाही' असे मला सांगितले होते.

तद्नंतर दिनांक 23/08/2023 रोजी मॅन्युअल याने माझे मोबाईल क्रमांकावर मिस काॅल केला होता. त्यावर मी, मॅन्युअल यास काॅल केला असता, मॅन्युअल याने मला दुपारी दोन वाजता उप निबंधक कार्यालय, ठाणे तालुका, भाईंदर येथे येण्यास सांगितले. तेव्हा मी सदर कार्यालयात गेली असता, तेथे मला मॅन्युअल भेटला आणि त्याने निबंधक कार्यालयातील कर्मचारी श्री. अलीहैदर शेख यांचेषी माझी भेट करून दिली आणि श्री.अलीहैदर शेख हे बिल्डींगना नोटीस इष्यु करण्याचे काम करतात असे सांगितले. त्यावेळी श्री. अलीहैदर शेख यांनी मला दोन दिवसांनी येण्यास सांगितले. श्री. अलीहैदर शेख हे निबंधक साहेबांच्या केबीनच्या बाहेरील डेस्कवर बसले होते. त्याच दिवशी संध्याकाळी मॅन्युअल याने मला व्हाॅटसअॅप करून अली हैदर शेख याचा मोबाईल नंबर 9011786444 दिला होता.

तद्नंतर दिनांक 24/08/2023 रोजी मी, मॅन्युअल यास फोन करून, मी उदया निबंधक कार्यालय आॅफीसला येणार असून, तुम्ही आहात का? असे विचारले असता, मॅन्युअल याने तो देखील आॅफीसला येणार आहे असे मला सांगितले होते.

दिनांक 25/08/2023 रोजी मी अंदाजे 3 वाजता उप निबंधक कार्यालय, ठाणे तालुका कार्यालय, भाईंदर येथे गेली असता, तेथे मला मॅन्युअल दिसला नाही. म्हणून मी, श्री. अलीहैदर शेख यांना जावून भेटली. त्यावेळी श्री. अलीहैदर शेख हे डेस्कवर बसले होते. त्यावेळी मी, श्री. अलीहैदर शेख यांना नोटीस बजाविण्याकामी विचारले असता, श्री. शेख यांनी मला बसण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांचे समोरील खुर्चीवर बसले व श्री. अलीहैदर शेख हे त्यांचे काम करीत होते. जवळपास पंधरा ते वीस मिनीटांनी त्यांचे काम संपल्यानंतर ते मला बोलले की मॅन्युअलने त्यांना सांगितले आहे की मी खर्च करायला तयार आहे. त्यावेळी मी त्यांना किती खर्च करावा लागणार असे विचारले असता, श्री. अलीहैदर शेख यांनी त्यांचे मोबाईलमधील कॅलक्युलेटर ओपन करून त्यावर 50 असे लिहीले. त्यावर



Scanned with CamScanner

मी त्यास 50 म्हणजे काय असे विचारले. त्यावर श्री. अलीहैदर शेख यांनी मला 50 हजार असे सांगितले आणि ते त्याच दिवषी संध्याकाळी 5 पर्यंत आणण्यास सांगितले. त्यानंतर मी शेख सर यांच्याजवळुन निघाली परंतु मी संध्याकाळी 5वाजेपर्यंत त्याच कार्यालयात होती. त्यानंतर सायंकाळी 5 वाजलेनंतर मी पुन्हा श्री.अलीहैदर शेख यांना आॅफीसमध्ये भेटले. त्यावेळी देखील श्री.अलीहैदर शेख यांनी मला बसवून ठेवले आणि अंदाजे 6 वाजेच्या सुमारास श्री.अलीहैदर शेख यांनी त्यांचे टेबलचा ड्राॅवर उघडून पैसे त्यात टाकण्यास सांगितले. त्यावेळी मी काहीच बोलले नाही. मी काहीच न बोलल्यामुळे श्री.अलीहैदर शेख यांनी त्यांचे बिल्डींगचे नावे नोटीस बनविली व नोटीस बनविल्यानंतर निबंधक साहेबांची सही घेवून आले. आणि नोटीसची प्रती मला दाखवून एक प्रत रजिस्टर्ड पोस्टाने बिल्डींगला पाठविण्यात येईल व एक प्रत मला देण्यात येईल असे सांगितले. तेव्हा देखील मी कोणताही प्रतिक्रीया दिली नाही. म्हणून त्याने मला 'पैसा' असे बोलला. त्यावेळी मी त्यास एवढया लवकर पैशाची व्यवस्था होवू शकली नाही कारण मला माझे कामगारांचे पगार सुध्दा देणे आहे. तसेच मी संध्याकाळी बाहेर जाणार आहे व मंगळवारी येणार असल्याचे सांगितले. आणि जर घाई असेल तर माझा माणूस सोमवारी येवून पैसे देवून जाईल असे सांगितले. त्यावेळी श्री.अलीहैदर शेख यांनी मलाच येण्यास सांगितले. त्यावर मी ठीक आहे असे बोलून तेथून निघून आले होते. त्यावेळी तेथे मॅन्युअल आला व त्याने मला माझे कामाबाबत विचारले असता. मी त्यास 50 हजार मागत असल्याचे सांगितले. त्यावर मॅन्युअल याने ते जास्त मागत असल्याचे सांगून मी बोलतो असे मला सांगितले. त्यावेळी श्री. अलीहैदर शेख हे देखील मॅन्युअल सोबत बोलून घेतो असे मला बोलल्यावर मी तेथून निघून आली होती.

यावरून माझी अशी खात्री झाली की, मी जर उप निबंधक कार्यालय, ठाणे तालुका, भाईंदर चे कर्मचारी श्री. अलीहैदर शेख यांनी मागणी केलेले 50 हजार रूपये दिले नाहीत तर ते माझे सोसायटीचे विरूध्द नोटीस काढणार नाहीत. आणि मला लोकसेवक श्री. शेख यांना 50,000 रूपये देण्याची अजिबात इच्छा नसल्याने मी अॅन्टी करप्षन ब्युरो, ठाणे येथे दिनांक 28/08/2023 रोजी लेखी तक्रार दिली आहे. त्यानंतर पोनि श्री. थोरात यांनी मी, दिलेल्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असुन पडताळणी दरम्यान लाचेची रक्कमेची मागणी झालेनंतर लाचेचा सापळा आयोजित करणार असल्याची माहीती मला दिली.

त्यानंतर दिनांक 28/08/2023 रोजी अॅन्टी करप्षन ब्युरो ठाणे कार्यालयात माझे व पंचाचे वक्तव्य घेतले व पोनि श्री. थोरात यांनी आम्हा सर्वांना योग्य त्या सुचना दिलेनंतर, पडताळणी पथक, मी व दोन्ही पंच असे आम्ही उप निबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका कार्यालय, भाईंदर येथे रवाना झालो.

त्यानंतर मला डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर लावुन उप निबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका कार्यालय, भाईंदर पंच नं. 1 यांचेसह पाठविले असता लोकसेवक श्री. शेख यांनी माझेकडे 50,000/-रू. लाचेची स्पश्ट मागणी केली व तडजोडी अंती 45,000/-रू. घेण्याचे मान्य केले '' मी त्यांना माझे कामाचे विचारून ''अली हैदर सर.....सर मॅन्युअल सर ने क्या बोला ''मुझे बोलते है । बहुत जादा बता रहा है'' त्यावर लोकसेवक शेख हे ''मैं डायरेक्ट इनक्वायरी लगा रहा हु....आपको समज मे नहंी आ रहा है.'' असे म्हणाले असता तक्रारदार हे ''अरे अली सर आप समझो ना बात को आप इनकाॅयरी कर रहे हो...बराबर...आप इसको आॅडीट तो नंही बिठा रहे हो ना'' त्यावर लोकसेवक षेख हे ''कमिटी पुरा डिसबज होगा....अॅडमिनीस्टर बिठेगा...छह महिने अॅडमिस्टर बैठेगा... आपका जो काम है.....वो करेगा...छह महिने बाद इलेक्षन भी होगा....आॅडीट भी करेगा'' असे म्हणाले त्यानंतर मी कामासंबधी बोलुन पुन्हा लोकसेवक श्री. शेख यांना ''मेरे को लगता है की, बहोत ज्यादा है'' त्यावर इतर संभाशण करून श्री. शेख हे म्हणाले ''बोलो आप बोलो....देखो आप एक काम करो ा आप पाच कम कर दो बस.. पाच कम कर दो..पाच कम कर दो..''त्यावर मी त्यांना 'क्या' असे म्हणाले असता त्यांनी ''पाच हजार कम कर दो.. त्यावर मी '' पैंतालीस हजार'' असे म्हणाली असता त्यावर शेख हे 'हा' म्हणाले ''पाच हजार कम कर दु...असे मी म्हणाले असता शेख यांनी हा असे म्हणाले त्यावर मी ''उसमे दो ..दो हप्ता'' असे म्हणाले असता त्यांनी 'दो हप्ता मे कर दो' असे म्हणाले त्यावर मी ''अभी आप को तीन नोटीस निकालनी है ना..अरे मै क्या बोल रही हु..पहला पच्चीस फिर..दुसरा बीस फाइनल पेमेंट'' त्यावर श्री. शेख हे 'पहला तीस करो' असे म्हणाले त्यावर मी त्यांना 'पहला तीस करू..ठीक है' असे म्हणाले असता श्री. शेख हे 'पहाला तीस करो..बाद मे पंधरा लास्ट' असे म्हणाले त्यावर मी त्यांना 'ठीक है अभी मुझे वो कभी दोगे वो नोटीस, कल लेके आउ कल फाईनल दे देती हु ा कितने बजे आउ ये ही टाईम आउ..पक्का. असे विचारले असता 'ग्यारह बजे आओ' तसेच 'पंधरा मै इन्क्वाईरी को आउंगा तब देना पडेगा'' असे म्हणाले. त्यांनतर पोनिरी थोरात यंानी डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर वरील ध्वनिमुद्रीत झालेले संभाशण पंचासमक्ष एैकले असता लोकसेवक श्री.अली हैदर शेख यांनी तक्रारदार श्रीमती गुप्ता यांचे सोसायटीला नोटीस काढण्याकरीता, बिल्डींगवर प्रषासक नेमण्याकरीता, इलेक्शन घेण्याकरीता व आॅडीट करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे 45 हजार रूपये मागत असल्याचे व त्यातील पहिला हप्ता म्हणून रू. 30 हजार घेण्याचे मान्य करून तक्रारदार यांना उदया दिनांक 29/08/2023 रोजी सकाळी 11 वाजता कार्यालयामध्ये



Scanned with CamScanner

बोलावित असल्याचे स्पष्ट झाले.

तद्नंतर पोनि श्री. थोरात यांनी दिलेल्या सुचनेवरून मी दिनांक 29/08/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे कार्यालयात सकाळी हजर झाली. त्यानंतर मला पोनि थोरात यांनी सापळा कारवाईकामी वापरावयाकरीता 30,000/-रू. लाचेची रक्कम हजर करण्यास सांगीतले असता माझेजवळ केवळ 25,000 रू. उपलब्ध असल्याने मी माझेजवळील 25,000/-रू. हजर केले त्यामध्ये 500/-रू. दराच्या 50 नोटा असे होते. सदरची रक्कम पो. निरी.थोरात यांनी ताब्यात घेवुन ती पोहवा परदेषी यांच्याकडे दिली, त्या नोटांना पोहवा परदेशी यांनी पंचासमक्ष अॅन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक दाखविले. तद्नंतर माझे व पंचाचे वक्तव्य घेतले व पोनि श्री. थोरात यांनी आम्हा सर्वांना योग्य त्या सुचना दिलेनंतर, पडताळणी पथक, मी व दोन्ही पंच असे आम्ही उप निबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका कार्यालय, भाईंदर येथे रवाना झालो.

त्यानंतर मी, लोकसेवक श्री. शेख यांनी मागणी केल्याप्रमाणे 25,000/-रू. लाचेची रक्कम घेवुन उप निबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका कार्यालय, भाईंदर कार्यालयात रिक्षाने पंच नं. 1 यांचेसोबत गेले. तेथे पोहचल्यानंतर आम्ही लिफ्टने सदर कार्यालयाच्या तिस-या माळ्यावर गेलो. तिस-या माळ्यावर पोहचल्यावर आम्ही श्री. शेख यांचे समोर जावून उभे राहिलो. तेव्हा तिथे आणखी दोन ते तीन लोक लोकसेवक श्री. शेख यांचेसोबत बोलत होते. ते लोक गेल्यानंतर मी लोकसेवक शेख यांना माझे नोटीसचे बाबत विचारले तेव्हा त्यांनी मला पैसे आणले का असे विचारले तेव्हा मी त्यांना हा बोलली. तेव्हा ते आतमध्ये साहेबांचे केबीनमध्ये गेले आणि आतून नोटीस घेवून आले. तेव्हा मी त्यांचे बाजूच्या खुर्चीमध्ये जावून बसली. तेव्हा लोकसेवक शेख यांनी त्यांचे कार्यालयीन टेबलचा ड्रॉवर उघडून त्यात पैसे ठेवण्यास सांगितले. तेव्हा मी माझे हॅंडपर्समधील लिफाफा माझे डाव्या हाताने काढून तो लोकसेवक श्री. शेख यांनी सांगितल्यावरून त्यांचे कार्यालयीन टेबलचे ड्रॉवरमध्ये ठेवला. त्यानंतर लोकसेवक शेख यांनी नोटीसवर मला सही करण्यास सांगितले. त्यावरून मी सदर नोटीसवर सही केली व माझा उजवा हात माझे डोक्यावरून वारंवार फिरवून लाचेच्या रकमेचा स्विकार झाल्याचा पुर्व नियोजित इषारा केला. मी केलेला इशारा पाहुन पोनिरी.थोरात, पंच व सापळा पथकाने येवुन लाचेच्या रक्कमेसह लोकसेवक श्री. अलीहैदर शेख यांना 15.10 वा. रंगेहाथ पकडले.

त्यानंतर पोनिरी थोरात यांनी केलेल्या तपासणीत लोकसेवक श्री. शेख यंानी लाचेची रक्कम स्विकारल्याने सदरची रक्कम रुपये 25,000/- पंचांसमक्ष लोकसेवक श्री. शेख यांचे कार्यालयीन टेबलचे ड्रॉवरमधून ताब्यात घेतली व त्या नोटांवरील क्रमांकांची तपासणी केली असता ते सापळापूर्व पंचनामामध्ये नोंदविलेल्या नोटांचे क्रमांकाप्रमाणे जुळून आले. त्यानंतर पोनिरी थोरात यांनी ताब्यात घेतलेल्या इसमास त्याचे नाव विचारले असता त त्यांनी आपले नाव श्री. अलीहैदर दगडु मिया शेख वय 35 वर्श, नोकरी - मुख्य लिपीक, उप निबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका कार्यालय राहणार - ईलाईट टॉवर, 502, 5 वा मजला, काजूपाडा, बोरीवली नॅशनल पार्कचे बाजूला, बोरीवली (पुर्व) असे सांगितले.

त्यानंतर पोनिरी थोरात यांचे सुचनेवरून सदर ठिकाणी अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाषात केलेल्या तपासणीत श्री. अली हैदर शेख यांचे कार्यालयीन टेबलचे ड्रॉवरमध्ये व ताब्यात घेतलेल्या नोटांना देखील अंथ्रासिन पावडर लागल्याचे तपासणीत दिसून आले. तसा पडताळणी, सापळापुर्व-सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा माझे समक्ष करण्यात आला आहे.

अशा प्रकारे यातील लोकसेवक श्री. अलीहैदर दगडु मिया शेख वय 35 वर्श, नोकरी - मुख्य लिपीक, उप निबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका कार्यालय राहणार - ईलाईट टॉवर, 502, 5 वा मजला, काजूपाडा, बोरीवली नॅशनल पार्कचे बाजूला, बोरीवली (पुर्व) यांनी माझेकडे मी राहत असलेल्या सोसायटीला नोटीस काढण्याकरीता, प्रशासक नेमण्याकरीता, इलेक्शन करण्याकरीता व आॅडीट करण्याकरीता 50,000/-रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 45,000/-रू. घेण्याचे मान्य करून, त्यातील पहिला हप्ता म्हणून 25,000/- रू. लाचेची रक्कम दिनांक 29/08/2023 रोजी स्विकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले आहेे. म्हणुन माझी श्री. अलीहैदर दगडु मिया षेख, वय 35 वर्श, नोकरी - मुख्य लिपीक, उप निबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका कार्यालय राहणार - ईलाईट टॉवर, 502, 5 वा मजला, काजूपाडा, बोरीवली नॅशनल पार्कचे बाजूला, बोरीवली (पुर्व) यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

Scanned with CamScanner